# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

---

जा.क्र.तंशिविकापु/विवि/दक्षता/२०१९-२०/ 3494
दिनांक : 23 AUG 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व पदविका तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या
पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय :- महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र "दक्षता" उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत.**

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्रमांक : ११/तंशिसं/दक्षता/२०१९-२०/२६१, दिनांक १९.०८.२०१९
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे अ.शा.पत्र क्र.पोमसं/४०/दक्षता/९०६१/दक्षता-तपास कथा/५२/२०१९, दि. १७.०७.२०१९

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क.संकीर्ण-२०१९/(प्र.क्र.५६/१९)/ समन्वये, दि. ०६.०८.२०१९ च्या पत्रान्वये, संचालनालयास अग्रेषित केलेले पोलीसांचे उत्कृष्ट काम हे जनसामान्यांपर्यंत पोहचवण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाय योजना करण्याचे निर्देश मा. पंतप्रधान महोदयांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य पोलीसांचे मुखपत्र "दक्षता" हे मासिक उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थापमुखांना या पत्राव्दारे निर्देशित करण्यात येते की, आपल्या संस्थेस आवश्यक असलेल्या संख्येनुसार "दक्षता" मासिक प्रतिमाह खरेदी करुन, त्या प्रती संस्थेतील विद्यार्थ्यांना वाचनालयात उपलब्ध करुन देवून, केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत : संदर्भ क्र. १ च्या पत्राची छायाप्रत.

प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

## ३,महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -४०० ००१

E-mail:- desk11 @dtemahsrashtragov.in Internet: dtemahsrashtra.gov.in

दूरध्वनी : ०२२-३०२३३४७०/४११/,२२६९०६०२,२२६४११५०/५१ , फॅक्स 22690007


ई - परिपत्रक

क्र.११/तंशिसं/दक्षता /२०१९-२०/ २६७

दि. १७/०८/२०१९

प्रति,

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय - महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र “दक्षता” उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ - पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,यांचे अ.शा.पत्र क्र.पोमसं/४०/दक्षता/९०६९/दक्षता-तपास कथा/५२/२०१९, दि.१७/०७/२०१९

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उच्च् व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.संकिर्ण -२०१९/( प्र.क्र.५६/१९)/ समन्वये, दि.०६/०८/२०१९ पत्रान्वये या कार्यालयास अग्रेषित केलेले पोलीसांचे उत्कृष्ट काम हे जनसामन्यांपर्यत पोहोचण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाय योजना करण्याचे निर्देश मा.पंतप्रधान महोदयांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य पोलीसांचे मुखपत्र “दक्षता” हे मासिक उच्च् व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्थांना आवश्यक असलेल्या संख्येनुसार “दक्षता” मासिक प्रतिमाह खरेदी करुन त्या प्रती संस्थेतील विदयार्थ्यांना वाचनालयात उपलब्ध करुन देण्याचे निर्देश आपल्या अधिपत्याखालील तंत्रशिक्षण संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यात यावे.

(डॉ.सुरेश मावलकर )

प्र.सहसंचालक,

तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत - मा. श्री.द.रा.कहार,उपसचिव, उच्च् व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीसाठी सादर.


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

21 AUG 2019

आवक क्र. 1973